REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधान: ” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ३० नोव्हेंबर, १९४९ अंक ५६


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिश: भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर — भ. अं. दप्तरदार, बी. ए., चेअरमन.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०८ |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन — श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

तयार कपड्यांचे व्यापारी — **महिंद्रकर ब्रदर्स** — बुधवार चौक, पुणें

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
व्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**हिंदुस्थानांतील बॅटऱ्यांचें उत्पादन**— हिंदुस्थानांत फ्लॅश लाइटसाठी लागणाऱ्या ५ कोटी रुपये किंमतीच्या बॅटऱ्या गेल्या-वर्षीं तयार करण्यांत आल्या. मोटारींना आणि रेल्वेसाठी लागणाऱ्या ३ कोटी रुपयांच्या बॅटरीज तयार करण्यांत आल्या.

**त्रावणकोरमध्यें कृत्रिम रेशमाचा कारखाना**—त्रावणकोर संस्थानांतील पेरुम् ह्या गांवीं लवकरच कृत्रिम रेशीम तयार करण्याचा एक कारखाना सुरू करण्यांत येणार आहे. ह्या कार-खान्यांत रोज ५ टन रेयॉन आणि १॥ टन पारदर्शक कागद तयार होईल. त्याशिवाय हिंदुस्थान सरकारला वैमानिकांच्या छत्रीसाठीं लागणारें रेशमाचें कापडही बनविण्यांत येणार आहे. कार-खान्याच्या भांडवलापैकीं २० टके भांडवल त्रावणकोर-कोचीन संयुक्त-सरकारचें असून बाकीचें सार्वजनिक रीत्या उभारलेलें आहे.

**म्हैसूर संस्थानांत प्लॅस्टिकचा कारखाना**— बंगलोर येथें प्लॅस्टिकचा कारखाना काढण्याचा विचार म्हैसूरचें सरकार करीत आहे. त्यासाठी एका ब्रिटिश कंपनीचे तिघे तज्ज्ञ सध्यां बंगलोरला आले आहेत. बंगलोर येथील रेडिओ-इलेक्ट्रिकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनीच्या इमारतींत हा कारखाना चालू करण्यांत येणार आहे. कारखान्याला ८ लाख रुपये किंमतीची यंत्रसामुग्री ब्रिटिश कंपनीनें पुरविलेली आहे. ह्या ब्रिटिश कंपनीनें शिक्षण दिलेल्या हिंदी तज्ज्ञांच्या हातांत कारखाना देण्यांत येणार आहे.

**कराचींत सिगारेटचा कारखाना**—ब्रह्मदेशांतील एक मुसलमानी कंपनी कराची येथें सिगारेटचा कारखाना काढणार आहे असें समजतें. कंपनीला पाकिस्तान सरकारकडून कारखाना काढण्याची परवानगी मिळाली आहे. कंपनीचें सर्व भांडवल ब्रम्ही कंपनीचेंच रहाणार आहे. पाकिस्तान सरकार यंत्रसामुग्री मिळविण्यासाठी मदत करणार असून इतर सवलती देणार आहे.

**दोन समुद्रांना जोडणारा प्रचंड कालवा**—बाल्टिक समुद्र आणि काळा समुद्र ह्यांना जोडणाऱ्या प्रचंड कालव्याच्या कामाला रशिअन एंजिनिअर्सच्या देखरेखीखालीं प्रारंभ झाला आहे. ह्या कालव्यानें युरोपमधील डॅन्यूब आणि ओडर ह्या मोठ्या नद्या जोडल्या जातील. कालवा पुरा होण्यास ६ वर्षांचा काळ लागेल.

**हैद्राबाद संस्थानमधील कारखाने**—हैद्राबादच्या सरकारनें संस्थानच्या हद्दींतील कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या जीवनाची चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली होती. ही कमिटी आपला अहवाल डिसेंबर १९४९ मध्यें सादर करणार आहे असें समजतें. सध्या कमिटीचे सभासद औरंगाबाद, परभणी, नांदेड इत्यादी ठिकाणच्या कारखान्यांची तपासणी करण्याच्या दौऱ्यावर आहेत.

**चलनाचें अवमूल्यन आणि गव्हाची किंमत**—आंतरराष्ट्रीय गहू कराराप्रमाणें गव्हाची किंमत सोन्याशीं निगडीत करण्यांत आलेली असल्यानें हिंदला ऑस्ट्रेलिआचा गहू ४४ टके महाग पडणार आहे. तथापि इतर वस्तूंच्या किंमतींत मात्र फरक पडणार नाहीं. कारण, हिंदप्रमाणें ऑस्ट्रेलिआनेंहि आपल्या चलनाची किंमत उतरविली आहे. गव्हाच्या ह्या भयंकर वाढलेल्या किंमतीबद्दल हिंदनें आंतरराष्ट्रीय गहू परिषदेकडे तक्रारही केली आहे. गहूं कराराचा मुख्य उद्देश गव्हाच्या किंमती स्थिरावणें आणि अन्नधान्याचा तुटवडा असलेल्या देशांना योग्य किंमतीला पुरेसा गहू पुरविणें हा आहे. ह्या हेतूला गव्हाच्या किंमती सोन्याशीं जोडल्यामुळें बाध येत आहे, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**हिंदुस्थानचें औद्योगिक भवितव्य**— कलकत्ता ट्रॅमवेज कंपनीची वार्षिक सभा नुकतीच झाली. ह्या सभेंत अध्यक्ष मि. जॉफ्रे क्लार्क म्हणाले कीं, हिंदुस्थानचें औद्योगिक भवितव्य उज्वल आहे. माझ्याजवळ जर गुंतविण्यासारखे पैसे असते तर ते हिंदु-स्थानांत गुंतविण्यांत मला आनंद वाटला असता, असेंहि उद्गार त्यांनीं काढले.

**जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न**—ऑक्टोबर १९४९ मध्यें जी. आय. पी. रेल्वेला अंदाजें ३,५७,६३,००० रुपये उत्पन्न झालें. तें धरून फडणिशी वर्षाचें उत्पन्न २४,९५,०५,००० रुपये असावें. गेल्या वर्षीच्या ह्याच कालांतील आंकडे अनुक्रमें ३,३६,१०,००० रु. आणि २१,२४,०६,००० रु. असे आहेत.

**सोलापूरच्या हातमाग कामगारांची मागणी**—सोलापूर हातमाग विणकर संघानें सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं, साड्या व स्त्रियांना लागणारें तत्सम इतर कापड ह्यांची निर्मिती करण्याला गिरण्यांना बंदी करण्यांत यावी. साड्यांसारखें कापड गिरण्यांनीं मोठ्या प्रमाणावर काढल्यामुळेंच कापडाचे साठे तुंबून राहिले, असें मतही संघानें आपल्या ठरावांत व्यक्त केलें आहे. सोलापुरांत १२,००० हातमाग असून त्यावर बहुतेक साड्याच विणण्यांत येतात. गेल्या तीन महिन्यांत हातमागावर तयार झालेलें सुमारें २० लाख रुपयांचें कापड गिऱ्हाइकांच्या अभावीं पडून राहिलें आहे असें समजतें.

**सायकलीच्या कारखान्याला सरकारी मदत**—मद्रास सर-कारनें त्या प्रांतांत सायकलीचा कारखाना उभारण्यासाठी २५ लाख रुपये मदत म्हणून देण्याचें ठरविलें आहे. तथापि, ही मदत कारखान्याच्या संस्थापकांनीं स्वतः ३० लाख रुपये भांडवल जमविलें तरच मिळणार आहे. मदत मद्रास स्टेट एड टु इंडस्ट्रीज ॲक्टाच्या कलमान्वयें देण्यांत येणार आहे.

**हिंदमधील यांत्रिक हत्यारांचा धंदा**—हिंदमधील यांत्रिक हत्यारांच्या धंद्यानें गेल्या कांहीं वर्षांत चांगली प्रगति केली आहे. १९३७ सालीं हिंदुस्थानांत अवघीं १०० यांत्रिक हत्यारें तयार झालीं. १९४४ सालीं त्यांची संख्या ५,००० पर्यंत आली. तथापि ह्या धंद्यानें निर्माण केलेल्या यंत्रांपैकीं बराच माल विकला न गेल्या-मुळें, कंपन्यांच्या वसूल भांडवलापैकीं ५० टके रक्कम निष्कारण गुंतून राहिली. देशी यांत्रिक हत्यारें वापरण्यासंबंधीं ग्राहकांची अनास्था, हें माल पडून रहाण्याचें कारण आहे. परदेशी मालाची गेल्या कांहीं काळांत बरीच आयात झाल्यामुळें देशी यांत्रिक हत्यारांचें उत्पादनही घटलें आहे. दरवर्षी १,२५,००,००० रुपयांचीं यंत्रिक हत्यारें तयार करणें शक्य आहे. तथापि १९४८ सालीं ५०,००,००० रुपयांचींच हत्यारें तयार करण्यांत आलीं. १९४९ सालीं तर फक्त ३७,००,००० रुपये किंमतीचींच यंत्रें तयार करण्यांत येण्याचा संभव आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ३० नोव्हेंबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## विलीन संस्थानांतील कारखान्यांच्या सवलती

### भोर येथील सम्मेलनाची मागणी

भोर येथें दि. १८, १९ व २० ह्या दिवशीं दक्षिणी महाराष्ट्रांतील कारखानदारांचें संमेलन भरलें होतें. ह्या संमेलनानें सद्यःस्थितीचा सर्वांगीण विचार करून व आपल्या कर्तव्यतत्परतेस व जबाबदाऱ्यांस अनुसरून योग्य असे ठराव संमत केले आहेत. सामान्यतः महाराष्ट्रीय कारखानदारांचा पिंडच वेगळ्या प्रकारचा आहे; त्यांना भारतांतील इतर व्यापारी–कारखानदारांच्या मालिकेंत बसवून त्यांचेवर देशद्रोहीपणाचा सरसकट आरोप करणें समर्थनीय होणार नाहीं, हें कोणीहि जाणता मनुष्य मान्य करील. भोर येथील कारखानदार संमेलनाचे प्रसंगीं मुंबई सरकारचे संवर्धन मंत्री, ना. निंबाळकर ह्यांनीं आपल्या भाषणांत काळा बाजार व नफेबाजी न करण्याचा उपस्थितांना उपदेश केला, तो चालू फॅशनला धरून असला तरी औचित्यपूर्ण नव्हता, असें म्हणणें भाग आहे.

संमेलनानें ज्या प्रश्नांचा मुख्यतः विचार केला, त्यांतील एक विषय विलीन संस्थानांतील कारखान्यांच्या सवलती चालू रहाण्यासंबंधींचा होता. दक्षिणी संस्थानांनीं कित्येक सवलती देऊन कारखानदारीस प्रोत्साहन दिलें : म्हणनच महाराष्ट्रांत इतक्या कारखान्यांची स्थापना व वाढ होऊं शकली. ह्या सवलतींना भरमसाट म्हणतां येणार नाहीं; इतर अडचणींची भरपाई त्यांनीं होऊं शकते, एवढेंच त्यांचें मर्यादित स्वरूप बहुधा आहे. पूर्वींचे करार मुंबई सरकारावर कायदेशीर दृष्ट्या बंधनकारक नाहींत, म्हणून तर ते करार चालू ठेवावेत अशी विनंति करण्याची कारखानदारांवर पाळी येत आहे! प्राप्तीवरील कराचा कायदा विलीन संस्थानी हद्दीस आतां लागू झाला आहे, परंतु कांहीं वर्षें तरी संस्थानांतील कारखान्यांना त्यांतून माफी मिळावी, अशी कारखानदारांची एक मागणी आहे.

ह्या संबंधांत कृष्णमाचारी कमिटीच्या शिफारसीकडे लक्ष वेधण्यांत येत आहे. हिंदी संस्थानें व संस्थानांचे संघ ह्यांचा आर्थिक व कराविषयक दृष्टीनें दर्जा प्रांतांच्या बरोबरीनें कसा आणतां येईल, ह्याचा विचार प्रस्तुत कमिटीनें करून शिफारशी केल्या. दहा वर्षांचे अवधींत हें एकत्रीकरण पुरें व्हावयाचें आहे. १ एप्रिल १९५० पासून सर्वत्र इनकम टॅक्स सुरू झाला, तरी प्रचलित हिंदी कराच्या दराची अंमलबजावणी एकदम सुरू करतां येणार नाहीं; म्हणून दोन–तीन–पांच वर्षांमध्यें कराचा दर वाढवीत वाढवीत तो हिंदी दराइतका केला जाईल. परंतु, ही सवलत प्रांतांत विलीन झालेल्या संस्थानी मुलुखाला व चीफ कमिशनर्स प्रॉव्हिन्सेसना मिळणार नाहीं. १९४९–५० च्या उत्पन्नावर त्यांना हिंदी कराचा दरच लागू होईल. म्हणजे म्हैसूर, सौराष्ट्र, मध्यभारत, विंध्य प्रदेश इत्यादींमध्यें ज्या सवलती मिळतील, त्या बडोदें, कोल्हापूर, सांगली, मिरज, भोर, इत्यादि ठिकाणीं मिळणार नाहींत. ज्या संस्थानांनीं पूर्णपणें विलीन होऊन, हिंदी संघराज्याशीं एकरूप होण्याचें ठरविलें, तेथील लोकांना हें प्रायश्चित मिळत आहे!

"दक्षिणी महाराष्ट्रांतील कारखानदारांची मागणी त्यांच्या दृष्टीनें योग्य असली तरी ती समर्थनीय नाहीं; संक्रमण कालांतील अडचणी दूरदर्शीपणानें, धैर्यानें व युक्तीनें सोडविल्या पाहिजेत परंतु लोकसत्ताक राज्यास आणि आर्थिक प्रगतीस कांहीं किंमत पडणें अपरिहार्यच आहे." असा समजूतदारपणाचा सल्ला मुंबईच्या एका इंग्रजी वृत्तपत्रानें दिला आहे. दुसऱ्या एका इंग्रजी वृत्तपत्रानें, "युद्धकाळांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील नागरिकांनीं हिंदी संस्थानांत कारखाने काढले, ते गुंडाळण्यांत तरी आले आहेत किंवा ते त्याच मार्गावर आहेत" असें निर्विकारपणें लिहिलें आहे. दक्षिणी महाराष्ट्रांतील कारखानदार, कामगार व जनता ह्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे इतर कसें निर्विकारपणें पाहूं शकतात, हें समजण्यास वरील दोन उतारे पुरेसे होतील. ह्या परिस्थितींतूनच मार्ग काढावयाचा आहे, आणि इतर सर्व प्रश्नांचे बाबतींतहि हाच अनुभव येण्याचा संभव आहे, हें गृहीत धरूनच पुढें पाऊल टाकलें पाहिजे.

---

### भांडवल उभारणीचे निराशाजनक आकडे

नव्या भांडवल उभारणीस मिळालेल्या ताज्या मंजुरीचे आकडे पाहिले असता, आतां भांडवलाचा संचय व गुंतवणूक ह्यांस ओहोटी लागली असल्याचें आढळून येतें. १९४३ च्या मे महिन्यांत हिंद सरकारनें भांडवल उभारणीवर बंधनें घातलीं, तेव्हांपासून १९४८ च्या डिसेंबर अखेर, म्हणजे सुमारें साडेपांच वर्षांत एकूण ८८९ कोटी रुपयांच्या भांडवलाचे उभारणीस कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजनें परवानगी दिली. इतक्या मोठ्या रकमेच्या उभारणीस परवानगी मिळाली, तरी फक्त २३० कोटी रुपयांचे शेअर्स विकले गेले आणि प्रत्यक्ष वसूल भांडवलाची रक्कम १९७ कोटी रुपयांवर गेली नाहीं. ह्या वसूल भांडवलाच्या आकड्यांतहि एक गोम आहे. कित्येक कंपन्यांनीं आपल्या गंगाजळीचें शेअर भांडवलांत रूपांतर केलें, कित्येक फर्म्सचें व खासगी कंपन्यांचें पब्लिक कंपन्यांत रूपांतर झालें व पौंडी शेअर भांडवलाच्या कित्येक कंपन्या रुपयाच्या भांडवलांत आल्या. म्हणजे, नवीन भांडवल आकर्षित न होता, असलेलें भांडवलच मूळ नांवाऐवजी नव्या नांवानें दाखल झालें. अशा रीतीनें, भांडवल उभारणीचा इतिहास फारसा उत्साहकारक नाहीं. भांडवल उभारणीवरील निर्बंधाची आतां काय आवश्यकता आहे? असा प्रश्न सहाजीकच उत्पन्न होतो. कंपनी कायद्यांत करावयाच्या दुरुस्त्यांचा एक मसुदा हिंद सरकारच्या व्यापार खात्यानें प्रसिद्ध करून, त्यावर मतें मागितलीं आहेत. ह्या दुरुस्त्यांचा हेतु, पैसे गुंतविणारांच्या हिताचें संरक्षण करणें, हा आहे. तो हेतु जरी साध्य झाला, तरी नवे उपक्रम हातीं घेणारांना त्यांतील तरतुदी जाचक वाटून भांडवल उभारणीचा प्रयत्न करणारास निरुत्साह वाटेल, अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. हिंदची आर्थिक व सर्वसाधारण परिस्थिति आशाजनक राहून देशी कारखानदारीस भरपूर वाव मिळण्यावरच बरेचसें अवलंबून राहील, हें उघड आहे.

## महाराष्ट्रांतील उदयोन्मुख शास्त्रज्ञांसाठी—

[ "अर्थ"च्या दिवाळी अंकांत (१९ आक्टोबर १९४९ च्या) डॉ. मो. वा. चिपळूणकर, पुणें, यांनीं "महाराष्ट्रांतील उदयोन्मुख शास्त्रज्ञांसाठीं—" या शीर्षकाखालीं एक विचारप्रवर्तक आणि महत्त्वपूर्ण लेख लिहिला आहे. त्यांत पुणें येथें भरणाऱ्या भारतीय शास्त्रीय परिषदेच्या आगामी अधिवेशनानिमित्त महाराष्ट्रांतील होतकरू संशोधकांच्या मार्गदर्शनासाठीं म्हणून त्यांनीं परिषदेचा थोडक्यांत इतिहास सांगून तिच्या सद्यःस्थितीचें यथायोग्य वर्णन केलें आहे. विशेषतः तिच्या एकंदर कार्यांत पहिल्यापासून महाराष्ट्राचा किती थोडा वाटा आहे, हें आकडेवार माहिती देऊन सिद्ध केलें आहे. महाराष्ट्राची या दिशेनें यापुढें प्रगति होण्यासाठी शास्त्रीय संशोधन कोणीं करावें, त्यांची पारख कोणीं व कशी करावी, यंदाच्या अधिवेशनांत कोणत्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे, या संधीचा फायदा आपण कसा करून घ्यावयाचा, आज हिंदुस्थानांत संशोधनासाठी लागणारा पैसा कोठून, कसा व किती मिळतो आणि तो कसा खर्च केला जातो, इत्यादि महत्त्वाचे मुद्दे त्यांनीं थोडक्यांत मांडले आहेत. शास्त्रीय संशोधन संस्थांसंबंधीहि त्यांनीं कांहीं गोष्टींचा उल्लेख करून अखेरीस महाराष्ट्राला एक स्वतंत्र प्रातिनिधिक शास्त्रीय परिषदेची आवश्यकता कां आहे हें सांगितलें आहे. अशा तऱ्हेचें महाराष्ट्रांतील शास्त्रीय प्रगतीसाठी केलेलें दिग्दर्शन वाचून, या लेखाला पोषक असलेले आपले विचार डॉ. श्री. द. लिमये, एम. एस्सी., पी. एच्‌डी. (नागपूर) यांनीं मुद्दाम लिहून आमच्याकडे धाडले आहेत. ]

रा. रा. संपादक "अर्थ" यांसः—

सप्रेम नमस्कार वि. वि. माझे मित्र डॉ. चिपळूणकर यांनीं आपल्या दि. १९-१०-४९ च्या अंकांत महाराष्ट्रांतील शास्त्रीय प्रगतीसंबंधीं जो विचारप्रवर्तक लेख लिहिला आहे, त्यासाठी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन केलें पाहिजे. खरोखरीच त्यांनीं महाराष्ट्राची मोठी सेवा केली आहे हा लेख परिश्रमपूर्वक लिहून. राष्ट्रीय हिताला बाधक न ठरतां पोषकच ठरेल असा मर्यादित प्रांताभिमान बाळगण्यानें माणसाच्या स्पर्धाळु वृत्तीस चालना मिळते असेंच मी मानीत असल्यानें या विषयासंबंधानें कांहीं विचार मांडण्याचा यत्न करीत आहे. यांत डॉ. चिपळूणकरांचे कोणत्याही विधानास बाध न येतां स्थलमर्यादेमुळें जेथें त्यांस केवळ सूत्ररूपानें विचार मांडावे लागले असावेत असें दिसतें, त्यांचें थोडें स्पष्ट निरूपण आणि वस्तुस्थितीचें थोडें अधिक निकट दर्शन करणें हाच मुख्य उद्देश आहे.

### "ज्याचा तो"

आजच्या भारतीय परिस्थितीचा विचार करतां अन्य क्षेत्राप्रमाणेंच आपण पहिली खूणगांठ बांधून ठेवावयास हवी ती ही कीं, विज्ञान क्षेत्रांत आपले तरूण अधिकाधिक चमकूं लागावेत असें ज्यांस खरोखरीच वाटतें त्यांनीं या दृष्टीनें महाराष्ट्रांत स्वतंत्र संघटना करणें आवश्यक आहे. केवळ शास्त्रीय संशोधनास वाहिलेल्या "रसायन निधी", सारख्या संस्था अन्य विषयांसाठींही आतां निघावयास हव्यात. आणि या सर्व संस्थांचा योगक्षेम जनतेंतील सुबुद्ध जनतेनेंच चालविण्याचा भार उचलणें प्राप्त आहे. सरकारी साह्य मिळण्यास यापुढें पूर्वी इतका त्रास पडणार नाहीं हें खरें. परंतु केवळ त्यावरच अवलंबून राहणें चूक ठरेल हेंही ओळखलें पाहिजे. अखिल भारतीय क्षेत्रांतून संधि मिळेल ती तर महाराष्ट्रीयांनीं घेतलीच पाहिजे. परंतु दुर्दैवानें ज्या गुणी बांधवांना त्या विशाल क्षेत्रांत वाव मिळणार नाहीं त्यांच्या शिक्षणाची, संशोधनाची सोय आपली आपण लावून दिली पाहिजे. एकलव्याप्रमाणें विज्ञानसेवा करण्याचें व्रत जर आम्हीं कांहीं काळ नेटानें चालविलें तर केव्हां ना केव्हां तरी याही क्षेत्रांत आपण योग्य तो वांटा उचललेला आहे असें अभिमानानें सांगतां येईल.

विज्ञानामधील "उपयुक्त" संशोधनाचेंच तेवढें आकर्षण ज्यांस वाटतें त्यांनीं त्या दिशेनें अवश्य जावें. तेंहीं काम आवश्यकच आहे. परंतु त्या इतकेंच महत्त्वाचें क्षेत्र ज्याला "शुद्ध स्वरूपाचें, तात्त्विक संशोधन" म्हणतात तेंही आहे हें विसरून चालणार नाहीं. आणि ज्याचा कल जिकडे असेल तिकडे त्याला संधि मिळाली तरच खरी प्रगति होते. आज शुद्ध स्वरूपाचें संशोधन-कार्य करूं इच्छिणाऱ्यांस आर्थिक साह्य मिळणें फारच कठीण होऊन बसतें. ही परिस्थिति बरी नाहीं; एवढेंच नव्हे तर राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें ती घातकच होय. म्हणून ती लवकर पालटणें आवश्यक आहे. राष्ट्रीय नियोजनांत दूरदृष्टि असली तरच तें हितकारी ठरतें.

### श्रमविभागाची आवश्यकता

आपल्याकडील सर्वच कार्यकर्त्यांना प्रसिद्धि मिळणें थोडें कठीण पडतें. या कामीं वृत्तपत्रकारांनाच खरोखरी बरेंच काम करतां येण्यासारखें आहे. स्वतः शास्त्रज्ञांनींच प्रसिद्धीसाठी धडपड करूं म्हटलें तरी तें त्यांस साधणें कठीणच जाणार. **अन्य प्रांतीय शास्त्रज्ञांस प्रसिद्धि मिळते याचें खरें कारण वृत्तवितरण करणाऱ्या संस्थांत त्या त्या प्रांतांतील अधिक माणसें आहेत आणि त्यांच्यांत स्वजनप्रेम अधिक असतें हें होय.** नाड्यावर चढून नाच करणें, ढोलगें वाजवणें, आणि नंतर थाळीही फिरवणें हीं सर्व कामें एकट्या शास्त्रज्ञाकडून निभणें शक्य नाहीं. ज्यांना कळतें त्यांनीं तरी नुसती प्रेक्षकाची भूमिका करण्याचें सोडल्यावांचून चालणार नाहीं. तेव्हां महाराष्ट्रीय प्रसिद्धितज्ज्ञांनीं आपल्या शास्त्रज्ञांविषयीं थोडी अधिक आस्था दाखवायला नको का? त्याचप्रमाणें संशोधनासाठी द्रव्यसाह्य गोळा करण्यासाठी स्वतः शास्त्रज्ञानें हिंडण्यांत त्याची स्वतःची कार्यनिष्ठा दिसत असली तरी त्याच्या समाजाची उदासीन वृत्तीही दिसते असें म्हणणें येतें. कारण शास्त्रीय संशोधनाचें कार्य करूं शकतील अशीं माणसें केव्हांही संख्येनें थोडींच असणार. म्हणून त्यांचा प्रत्येक क्षण कारणीं लागला पाहिजे. त्यांना जर समाजहित बुद्धीनें साह्य मिळवून देणारे दुसरे सहाय्यक मिळाले तर केवढा तरी लाभ होईल! संशोधकांना आपला सर्व वेळ केवळ आपल्या प्रयोगशाळेंत, ग्रंथालयांत वा चर्चामंडळांत व्यतीत करतां येऊन त्यांच्यांतील ज्येष्ठ शास्त्रज्ञांकडून उदयोन्मुख तरुणांना मार्गदर्शनही अधिक होईल, यासाठी श्रमविभाग तत्त्वाचा अवलंब करणें अत्यंत निकडीचें आहे. अर्थातच असें झालें म्हणजे स्वतः संशोधकांवरील दायित्वही आपोआपच वाढेल आणि इतर क्षेत्रांत लुडबूड करावीशी वाटणार नाहीं. सध्यां परिस्थिति उलट आहे. संशोधन कार्य करूं इच्छिणाऱ्यांसही चरितार्थ चालविण्यासाठी अन्य गौण क्षेत्रांत अनिच्छेनें जाणें भाग पडतें. असो.

विज्ञान परिषदेच्या आगामी अधिवेशनाच्या निमित्तानें डॉ. चिपळूणकर यांनीं घेतलेला आढावा आणि त्याचे आधारानें महाराष्ट्रांतील विज्ञान अभिवृद्धीसाठी केलेलें दिग्दर्शन निःसंशय विचारप्रवर्तक असल्यानें त्यास पोषक असे वरील विचार यथामति मांडले आहेत. त्यायोगें मूळ उद्दिष्ट साधण्यास साह्य होईल अशी आशा आहे.

दिनांक १-११-४९
डॉ. बुचे वाडा,
धरमपेठ, नागपूर.

(डॉ.) श्री द. लिमये

## परदेशांतील बातम्या

**सो. रशिआंतील शेतीची प्रगति**—अफगाणिस्थानच्या उत्तर सरहद्दीला लागून असलेल्या उझबेक सोव्हिएट ह्या उपराज्यांतील ७०,००,००० एकर वालुकामय जमीन आतां लागवडीखाली आणण्यांत आली आहे. सध्या तेथें फक्त गवतच लावण्यांत येत आहे. ह्या उपराज्याचा बहुतेक भाग वालुकामय आहे. तथापि आतां मोठ्या प्रमाणावर विहिरी खोदण्यांत आल्यानें शेतकऱ्यांच्या लहान लहान शेकडों वसाहती नव्यानें होत आहेत.

**पाकिस्तानांत लोकरीच्या कापडाच्या गिरण्या**—पाकिस्तानांत दरवर्षी सुमारें २,४०,००,००० पौंड लोकर निर्माण होते. त्यापैकीं ६७ टक्के लोकर अमेरिकेला आणि २५ टक्के इंग्लंडला विकण्यांत येत असे. ह्या लोकरीच्या ८ जाती आहेत. पाकिस्तान सरकार आतां लोकरीच्या धाग्याच्या पांच गिरण्या काढण्याचा विचार करीत आहे. शिवाय दोन लोकरीच्या कापडाच्या गिरण्याही उभारण्याचें घाटत आहे.

**ऑस्ट्रेलिआ पुन्हा मदतीला धांवला**—ऑस्ट्रेलिआचे इंग्लंडमधील हायकमिशनर मि. नॉर्मन मिचेल ह्यांनीं इंग्लंडचे फडणीस सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांना १ कोटी ऑस्ट्रेलिअन पौंड ऑस्ट्रेलिअन सरकारतर्फे इंग्लंडला देणगी म्हणून दिले. आतांपर्यंत ऑस्ट्रेलिआनें इंग्लंडला दिलेली ही तिसरी देणगी आहे. गेल्या तीन वर्षांत ऑस्ट्रेलिआनें इंग्लंडला ४॥ कोटी ऑस्ट्रेलिअन पौंडांची मदत केली आहे. इंग्लंडच्या सध्याच्या बिकट आर्थिक परिस्थितींत सक्रिय सहकार्य म्हणून ह्या देणग्या देण्यांत आल्या.

**लेनिनग्रॅडला मोठा स्टेडिअम**—लेनिनग्रॅड शहरांत १,००,००० प्रेक्षकांना बसतां येईल येवढ्या मोठ्या स्टेडिअमचें काम सध्या चालू आहे. ह्या स्टेडिअमला ६ मजले आहेत. शिवाय खेळाडूंसाठीं एक हॉटेल आणि खेळांच्या सामानाची दुरुस्ती करणारा एक कारखानाही स्टेडिअमला जोडूनच बांधण्यांत येणार आहे.

**नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान**—पाकिस्तान सरकारनें एक वटहुकूम काढून नॅशनल बँक ऑफ पाकिस्तान नांवाच्या, सरकारच्या आश्रयाखालील एका व्यापारी बँकेची स्थापना केली आहे. पाकिस्तानमधील आर्थिक व्यवहारांना आणि व्यापारी व औद्योगिक विकासाला मदत करण्याच्या हेतूनें ह्या बँकेची स्थापना करण्यांत आली आहे. सध्या बँकेचें काम ताग आणि कापूस ह्या दोन जिनसाबद्दलच्या व्यवहारांपुरतेंच मर्यादित रहाणार आहे. बँकेची मुख्य कचेरी कराचीला राहाणार असून कामकाजासाठीं एक सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर्स निर्माण करण्यांत येईल. डायरेक्टरांची संख्या १२ राहील. मुख्य बोर्डाखेरीज लाहोर, कराची आणि ढाका ह्या ठिकाणीं स्थानिक बोर्डेहि स्थापन करण्यांत येतील.

**'क्वीन मेरी' बोटीचें सौंदर्य प्रसाधन**—ब्रिटनची सर्वांत मोठी बोट 'क्वीन मेरी' ही सुमारें महिनाभर बंदरांत विश्रांति घेणार आहे. ह्या काळांत सुमारें १,५०० कामगार बोटीची रंग सफेती करणार आहेत. बोटीला आंतून व बाहेरून रंग देण्यासाठीं ४,००० गॅलन रंगरोगण लागेल. १२,००० सतरंज्या आणि गालिचे स्वच्छ करण्यांत येतील आणि १,००,००० लाकडी जिनसांना पॉलिश करण्यांत येईल. ही बोट ८१,००० टन वजनाची असून तींत १,९५० प्रवाशांची सोय आहे. बोट इंग्लंड–अमेरिका मार्गावर प्रवास करीत असते.

**जगांतील साखरेचें उत्पादन**— अमेरिकेच्या शेतकीखात्यानें असा अंदाज केला कीं १९४८–४९ ह्या सालीं जगांत साखरेचें उत्पादन ३,७२,७६,००० टन झालें. हें उत्पादन १९३५–३६ सालापेक्षां ७ टक्के अधिक आणि १९४७–४८ सालापेक्षां ८ टक्के अधिक आहे. खुद्द अमेरिकेंत १,०६,९५,००० टन साखर निर्माण झाली. त्याच्या पूर्वीच्या वर्षीपेक्षा हें उत्पादन ६ टक्क्यांनीं कमी आहे.

**हॉटेलच्या धंदेवाल्यांची जागतिक परिषद**—सर्व जगांतील हॉटेल धंदेवाल्यांची तिसरी परिषद् नुकतीच लंडन येथें पार पडली. ह्या परिषदेंत निरनिराळ्या २३ देशांतील ७५० हॉटेलवाल्यांनीं भाग घेतला होता. हिंदुस्थानांतील धंदेवाल्यांचे प्रतिनिधीहि हजर होते. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविण्यास हॉटेलसचा धंदा एक चांगला मार्ग आहे असें मत परिषदेनें व्यक्त केलें.

**अर्थशास्त्रज्ञ कीन्स ह्यांच्या पित्याचा मृत्यु**— ब्रिटनचे सुप्रसिद्ध दिवंगत अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड कीन्स ह्यांचे वडील मि. जे. एन्. कीन्स आपल्या वयाच्या ९७ व्या वर्षी नुकतेंच निधन पावले.

**अमेरिकन मालाचें प्रदर्शन**—१९५० सालीं एका अमेरिकन कंपनीनें अमेरिकन मालाचें एक फिरतें प्रदर्शन जगाच्या दौऱ्यावर पाठविण्याचें ठरविलें आहे. हें प्रदर्शन 'प्रेसिडेंट टॅफ्ट' नांवाच्या बोटीवर भरविण्यांत येईल. बोट जगांतील निरनिराळ्या प्रमुख बंदरांना भेटी देणार आहे. बोटीच्या दौऱ्यांत हिंदुस्थान, ब्रह्मदेश आणि सीलोन ह्यांचा समावेश करण्यांत आलेला आहे.

**हिंदुस्थानांत आलेले अमेरिकन प्रवासी**—१९४८ सालीं १,१०१ अमेरिकन प्रवासी समुद्रमार्गानें अगर विमानानें हिंदुस्थानांत येऊन गेले अशी माहिती अमेरिकन सरकारच्या वतीनें प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

**पूर्व जर्मनीचें आर्थिक धोरण**—मार्शल योजनेला उत्तर म्हणून रशिआनें जी मोलोटाव्ह योजना पूर्व युरोपसाठी तयार केली आहे त्या योजनेंत पूर्व जर्मनी सामील झाली आहे. पूर्व जर्मनीचें सरकार मॉस्को, प्राग आणि वॉर्सा ह्या शहरांत आपले व्यापारी प्रतिनिधी पाठविणार आहे. त्याशिवाय कम्युनिस्ट चीनशींहि व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यांत येणार आहेत.

## हिंदी बँकिंगचे ताजे आकडे

### शेड्यूल्ड बँकांची संख्या

| | ३०–९–१९४८ | ३०–९–१९४९ |
|---|---|---|
| एक्स्चेंज बँका | १५ | १५ |
| इतर शेड्यूल्ड बँका | ८४ | ८५ |

### शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | ३१–१२–१९४८ | ३०–६–१९४९ |
|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ३६८ | ३७५ |
| पांच प्रमुख जॉ.स्टॉ. बँका | ६७० | ६७६ |
| एक्स्चेंज बँका | ६३ | ६५ |
| इतर शेड्यूल्ड बँका | १,९१४ | १,८७८ |
| एकूण | ३,०१५ | २,९९४ |

३० जून, १९४९ अखेर संपलेल्या सहामाहींत शेड्यूल्ड बँकांनीं ३१ नव्या कचेऱ्या उघडल्या, परंतु ५५ चालू कचेऱ्या बंद केल्या. मिरज स्टेट बँक शेड्यूल्ड बँकांच्या यादींत आली, त्यामुळें ५ कचेऱ्या वाढल्या, तर डिस्कौंट बँक यादींतून गळल्यामुळें १ कचेरी कमी झाली.

### सहकारी शिक्षण फंड

मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिटयूटच्या शिक्षणफंडाकडे ३० जून १९४९ अखेर २६–अ ह्या कानूप्रमाणें एकूण १२,७७६ रु. जमा झाले. इन्स्टिटयूटनें हा नियम सोसायट्यांच्या निदर्शनास आणून रक्कम पाठविण्याची विनंति केली होती. त्यापैकीं कांहीं बँकांचा तपशील येथें दिला आहे:—

| | रु. |
|---|---|
| मुंबई प्रांतिक | ४,८७० |
| भुसावळ पीपल्स | २८१ |
| डेक्कन मर्चंटस | २५० |
| लासलगांव मर्चंटस | ३५ |
| बार्शी सेंट्रल | २२६ |
| शामराव विठ्ठल | ३२२ |
| रत्नागिरी अर्बन | ४०० |
| सोलापूर डि. सेंट्रल | ६९४ |
| कारवार अर्बन | ९७ |
| विजापूर डि. सेंट्रल | ३१५ |
| राजवाडे मंडळ पीपल्स | ५९ |
| अमळनेर अर्बन | १८९ |
| खानापूर अर्बन | ९० |
| मालवण को. अर्बन | १७५ |
| येवला मर्चंटस को. | ९७ |
| कराड अर्बन | ३६६ |
| शिरशी अर्बन | २५ |
| धुळें अर्बन | २६० |
| इस्लामपूर अर्बन | २० |

### बचतीची मोहीम आणि सहकारी संस्था

"बचतीच्या मोहिमेंत सहकारी सोसायट्या आणि बँका ह्यांच्यावर खास जबाबदारी पडते. सहकारी चळवळ ही काटकसर आणि स्वावलंबन ह्यावर उभारलेली आहे. सहकारी बँका ह्या शेतीपतपेढ्यांचीच एक महत्त्वाची पायरी होय. तथापि बँकांच्या व्यवहारांत कर्ज देण्याच्या बरोबरच ठेवी गोळा करण्याच्या कामाचाही अंतर्भाव होतो. म्हणून सहकारी सोसायट्यांनीं आणि बँकांनीं आपल्या सभासदांत बचत मोहिमेचा जोरकस प्रचार केला पाहिजे. शेतकऱ्याजवळ नेहमींच शिल्की पैसा नसेल. पण जेव्हां तो असेल तेव्हां तो ठेवीच्या रूपानें गोळा करणें अगत्याचें आहे. शेती पतपेढ्या आपला शिल्की पैसा सहकारी बँकांकडे ठेवतील आणि ह्या बँका चळवळीचा खर्च वजा जातां उरलेला पैसा सरकारी रोख्यांत गुंतवितील, आणि अशा रीतीनें राष्ट्रीय विकासाच्या योजनेस मदत होईल." :–मुं. प्रां. सहकारी इन्स्टिटयूटचें सर्क्युलर.

### राज्यशास्त्र परिषद

मद्रास येथें १९४९ च्या डिसेंबरच्या २९, ३०, ३१ ह्या तारखांना हिंदी राज्यशास्त्र परिषदेचें १२ वें अधिवेशन भरणार आहे. ह्या अधिवेशनाचें आमंत्रण मद्रास विद्यापीठाकडून आलें आहे. सर सी. पी. रामस्वामी अय्यर परिषदेचें उद्घाटन करणार आहेत.



अनुभवी मातांना हें ठाऊक आहे...
कीं तान्ह्या मुलांचा साधा अगर डांग्या खोकला "हूपसॅक" नियमितपणें दिल्यानें थोड्या दिवसांत साफ बरा होतो.
त्यांच्या संग्रहीं "हूपसॅक" असतेंच.


शाहू आयौषधि कारखाना लि., कोल्हापूर
B. C. PUBLICITY S.A.K. LTD. M/1

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
गिरगांव, मुंबई.
(टे. नं. ३११६७५) (स्थापना १९१८)
खेळतें भांडवल १ कोटीच्या वर.
व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., अध्यक्ष
शं. वि. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी
सब-ऑफिसः दादर ★ सब-ऑफिसः माहीम
बेळगांव शाखा : मार्केट, बेळगांव

दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड
हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.
★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.
आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.
शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## मोर येथील महाराष्ट्र कारखानदार परिषद्

लेखकः–श्री. वि. म. देवल, बी. कॉम्. पुणें २.

दक्षिण महाराष्ट्र कारखानदार संघाचें अधिवेशन भोर येथें नोव्हेंबरच्या १८, १९ व २० या तारखेस भरलें होतें. अधिवेशनांत चर्चिल्या जाणाऱ्या विषयांचें महत्त्व लक्षांत घेऊन संघानें सर्व महाराष्ट्रीय कारखानदारांना मुद्दाम निमंत्रणें पाठविलीं होतीं व बंगलोरपासून नागपूरपर्यंतच्या भागांतील बहुतेक महाराष्ट्रीय कारखानदार अधिवेशनास हजर होते. संघाच्या कार्यकर्त्यांनीं चालू सामाजिक अशांततेवर उपाय म्हणून एक विकास योजना चर्चेसाठी मांडली होती व त्या योजनेला अनुसरून तेथें पुष्कळ चर्चा झाली. चर्चा अगदीं उच्च पातळीवरून आणि फार सांगोपांग अशी झाली. नफ्याचा कांहीं भाग कारखानदारांनीं सामाजिक हितसंबंधासाठी खर्च करावा अशी सूचना होती. ही सूचना कोणाला अमान्य होती असें नव्हे, परंतु कारखानदारांनीं ही गोष्ट अंगावर घेऊं नये असेंच बहुतेकांचें म्हणणें पडलें.

### कारखानदारांचें कर्तव्यपालनाचें आश्वासन

कारखाना चालवून मालाचें उत्पादन करणें हें एक समाजकार्यच आहे. आपण जो माल तयार करावयाचा तो अधिकांत अधिक चांगला तयार करणें, शक्य तितक्या कमी किंमतीस तो गिऱ्हाइकांस देणें व त्या मालाचें उत्पादन जास्तींत जास्त करणें, हीं कारखानदारांचीं मुख्य कर्तव्यें आहेत. या गोष्टी केल्यास आपण उत्तम समाजकार्य केल्यासारखेंच होणार आहे आणि या गोष्टी करण्यास आम्ही पूर्ण सज्ज आहों असें सर्वांनीं सांगितलें. वरील गोष्टी करण्यासाठी कारखानदार कायेनें, वाचेनें, मनानें आणि पैशानें जेवढा प्रयत्न करील तेवढा कमीच पडेल. या गोष्टी करण्यासाठी खर्च होणारा पैसा व परिश्रम इतर सामाजिक कार्य करण्यासाठी देण्याचें ठरविल्यास तें समाजाच्या दृष्टीनेंही नुकसानीचें ठरेल असें त्यांचें म्हणणें होतें. पांच हजार रुपये खर्च करून एखाद्या कारखान्यांत नवीन यंत्र बसविल्यामुळें तेथें तयार होणाऱ्या मालाचा उत्पादन खर्च रुपयांत एक पैनेंही जरी कमी झाला आणि तो माल तेवढाच जर स्वस्त झाला तर समाजाचा जेवढा फायदा होईल तेवढा फायदा तेच पैसे इतरत्र खर्च करून होणार नाहीं हें उघड आहे. यासाठी कारखानदारांनीं आपलें लक्ष पूर्णपणें उत्पादनावर केंद्रित करावें आणि म्हणून 'कामकरी, शेतकरी व एकंदर जनता यांच्या विकासासाठी आम्हीं दक्षिण महाराष्ट्र कारखानदार आमच्या कर्तव्यक्षेत्रांत करतां येईल तेवढा शिकस्तीचा प्रयत्न करीत राहाण्याचें सरकारला व शेतकरी, कामकरी आणि सर्व सामान्य जनता या सर्वांना जाहीर आश्वासन देतों' असें त्यांनीं घोषित केलें आहे. अधिकांत अधिक उत्पादन, कमींत कमी किंमत व उत्तम दर्जाचा माल येवढ्या गोष्टी करण्याचें कारखानदारांनीं ठरविल्यानंतर त्यांच्यापासून आणखी कांहींही अपेक्षा समाजानें करूं नयेत असें मला वाटतें.

### कटुता टाळण्यासाठी परस्पर-संबंधांची निश्चितता

कारखानदारांनीं या गोष्टी करावयाचें ठरविल्यावर त्या गोष्टी करण्यासाठी योग्य ती परिस्थिति त्यांना उपलब्ध असली पाहिजे. मालाचें उत्पादन करण्यासाठी कच्चा माल वेळच्यावेळीं व भरपूर मिळणें, कामगारांनीं काम व्यवस्थित, खंड न पडतां व पुरेपूर करणें व सामाजिक शांतता या गोष्टींची जरूर आहे. यांपैकीं जेवढ्या गोष्टी मिळविणें कारखानदारांच्या हातांत आहे तेवढ्या गोष्टी ते मिळवतील परंतु ज्या गोष्टी सरकार, कामगार व जनता यांच्या हातांत आहेत त्या त्यांनीं उपलब्ध करून द्याव्यात अशी कारखानदारांनीं विनंती केली आहे. सरकारनें कच्चा माल भरपूर मिळेल अशी तजवीज करावी. कामगारांनीं संपाचें शस्त्र तूर्त कांहीं वर्षें म्यान करून आपल्या सर्व शक्तिनिशी भरपूर काम करावें. औद्योगिक तंटा निर्माण झाल्यास ताबडतोब संप न करतां तडजोडीनें तो मिटवावा. असे तंटे निर्माण होण्यास फारशी जागा राहूं नये व 'वर्गावर्गांच्या संबंधांत कटुता येणें हें उत्पादनाच्या बाबतींतलें फार मोठें संकट निदान आपल्या नियोजनाच्या कालखंडांत उत्पादनाच्या क्षेत्रांत आड येऊं नये यासाठी परस्पर वर्गांचे कायदेशीर व नैतिक संबंध सरकारनें सर्वांच्या विचारानें शक्य तितके निश्चित स्वरूपांत ताबडतोब ठरवून द्यावेत' व, जनतेनेंही कारखानदार हा एक समाजांतील महत्त्वाचा घटक आहे हें ध्यानांत घेऊन त्यांच्याशीं वागणूक ठेवावी अशी कारखानदारांची इच्छा आहे. महाराष्ट्रीय कारखानदार हे आपल्याला या देशाचेच नागरिक समजतात. देशाच्या उत्कर्षापकर्षावरच आपल्या कारखान्यांचें भवितव्य अवलंबून आहे हें ते जाणतात. कांहीं पुढारी म्हणतात त्याप्रमाणें वेळ पडली तर आपलें भांडवल गुंडाळून चीनांत अगर जपानांत अगर मसणांत जाणाऱ्या जातींचे हे लोक नाहींत. हा देश हीच आपली कर्तव्यभूमि असून त्याच्या उन्नतीसाठी पडतील ते कष्ट सोसण्यास आपण तयार आहोंत अशी घोषणा त्यांनीं केली आहे, व जनतेनें आणि पुढाऱ्यांनीं त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेऊं नयेत व पसरवूं नयेत अशी त्यांची कळकळीची विनंति आहे. असे गैरसमज पसरण्यामुळें कामगारांचें व कारखानदारांचें चित्त विचलित होतें व उत्पादनांत खंड पडतो. प्रस्तुत संकटांतून पार पडावयाचें तर उत्पादन भरपूर होण्यासाठी अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत व त्यांत किंचितही खंड पडेल असें कोणतेंही कृत्य कोणीही करूं नये अशी त्यांची मागणी आहे. आपल्या क्षेत्रांत ज्याप्रमाणें शिकस्तीचा प्रयत्न करण्याचें कारखानदारांनीं ठरविलें आहे त्याचप्रमाणें समाजाच्या इतर घटकांनींही आपापल्या क्षेत्रांत प्रयत्नांची शिकस्त करावी अशीही विनंति कारखानदारांनीं केली आहे. पारतंत्र्यामध्यें सर्व जबाबदारी परकी सरकारवर असते, परंतु स्वातंत्र्यामध्यें ही जबाबदारी समाजाच्या प्रत्येक घटकावर येऊन पडते. तेव्हां आतां प्रत्येकानें आपलीं कर्तव्यें जबाबदारीनें आणि निष्ठेनें पार पाडलीं पाहिजेत. "खानेकु मैं और लढनेकु मेरा बडा भाई" अशा वृत्तीनें सरकारवर अगर पुढाऱ्यांवर सर्व जबाबदारी ढकलून देऊन भागणार नाहीं. 'देशांतील इतर वर्गांनीं, विशेषतः कामगार व शेतकरी वर्गांनींही सरदारजींच्या वरील हांकेस होकार देऊन कारखानदार, कामकरी व शेतकरी या तिघांचें एकजुटीचें व स्नेहभावें सहकार्य, आर्थिक उत्पादन सर्व बाजूंनीं कमी खर्चानें व मालाची प्रत सुधारून वाढविण्याचे कामीं उत्साहभरानें निर्माण होईल अशी धोरणें आंखावींत' अशी त्या वर्गांना त्यांनीं जी विनंती केली आहे ती योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

### कोयना धरण

भोर येथें पसार झालेल्या पहिल्या ठरावाबद्दल येथवर विवेचन झालें. त्यावरून हें अधिवेशन पूर्णपणें कसें यशस्वी झालें याची कल्पना येईल. हा ठराव केल्यानंतर अत्यंत महत्त्वाच्या परंतु दृष्टि-तीत असलेल्या अशा दोन विषयांवर आणखी ठराव संमत करण्यांत आले. कोयना नदीवर हेळवाक येथें होणार म्हणून गाजत असलेलें धरण ही महाराष्ट्राच्या अत्यंत जिव्हाळ्याची गोष्ट आहे. या धर-

णावर तीन लाख किलोवॅट वीज निर्माण होईल व हजारों एकर जमिनीला पाणी मिळेल. पाटाचें पाणी मिळाल्यानें महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतांत शेतीचें उत्पादन अनेक पटींनीं वाढून देशांतील धान्य टंचाई नाहींशी होईल. येथील जनतेमध्यें जी अस्वस्थता व खळबळ आहे ती या उत्पादनवाढीमुळें शांत होईल. आर्थिक दृष्ट्या किती फायदा होईल याची थोडीशी कल्पना श्री. आत्मारामपंत ओगले यांनीं आपल्या भाषणांत सांगितलेल्या खालील माहितीवरून येईल. मुंबई प्रांतासाठी बंगालमधून दररोज एक हजार वॅगन्स कोळसा येतो. एक वॅगन वीस टनांची असते. एक टन कोळशास फक्त वाहतुकीचाच खर्च रु. १५ येतो. म्हणजे दररोज तीन लाख रुपये कोळशाच्या नुसत्या वाहतुकीसाठीच खर्च होतात. कोयना धरणावर निर्माण होणाऱ्या विजेनें या कोळशावर चालणारे सर्व कारखाने चालून आणखी पुष्कळ वीज शिल्लक राहील. यांचा अर्थ असा कीं, कोयना धरणामुळें दरवर्षी फक्त कोळशाच्या वहातुकीवर खर्च होणारे रु. ११ कोटी जरी वांचले तरी चारपांच वर्षांतच धरणासाठी खर्च झालेला सर्व पैसा भरून निघेल. मूळ कोळशाला पडणारी किंमत, डिझेल ऑईल, क्रूड ऑईल, रॉकेल, लाकूड, लाकडी कोळसा व इतर पदार्थ, जे शक्तीच्या निर्मितीसाठी व उजेडासाठी वापरले जातात त्यांची किंमत हिशेबांत धरलीच नाहीं. ही वीज खेड्यापाड्यांतून खेळविल्यामुळें अनेक घरगुती आणि लहान धंदे चालू होतील व उत्पादन किती तरी वाढेल तें वेगळेंच. तेव्हां इतकी प्रचंड अर्थोत्पादक योजना सरकार ताबडतोब हातांत घेऊन पुरी कां करीत नाहीं याबद्दल जनतेच्या मनांत अनेक शंकाकुशंका आल्यास नवल नाहीं व ही योजना जितकी लांबणीवर पडेल तितकी अधिक अस्वस्थता जनतेमध्यें निर्माण होणें अगदीं साहजिक आहे. या बाबतींत कृष्णा कॅनॉल बागाइतदार संघाचे अध्यक्ष रा. नानासाहेब सावंत यांनीं आपल्या भाषणांत 'नाहीं तर परिस्थिति गंभीर आहे' हे उच्चारलेले शब्द यथार्थदर्शी आहेत असें मला वाटतें. ही परिस्थिति लक्षांत घेऊन या धरणासंबंधीं निश्चित योजना सरकारनें जनतेपुढें मांडावी असा जो आग्रह अधिवेशनांत धरला गेला तो अगदीं योग्य आणि अत्यंत जरूर असाच होता. सरकारनें आपली योजना ताबडतोब जाहीर केली पाहिजे.

### संस्थानी हद्दीमधील कारखान्यांच्या सवलती

संस्थानांतील करारांचे भवितव्याचा प्रश्नही दक्षिण महाराष्ट्रांतील कारखानदारांच्या दृष्टीनें अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. हे करार चालू राहिले नाहींत तर तेथील कारखानदारांवर करांचा बोजा आत्तांपेक्षां जास्त पडून उत्पादन खर्च निश्चित वाढेल व कारखाने चालविणें अत्यंत कठीण होऊन बसेल. कांहीं अंशीं कारखान्यांचें अस्तित्वच या करारांवर अवलंबून असल्यामुळें तो विषय त्यांना इतका महत्त्वाचा वाटावा हें साहजीक आहे; व या करारांमुळें मिळालेल्या सवलती आणखी कांहीं वर्षें चालू राहणें हेंही अत्यंत जरूर आहे.

### मंत्र्यांचें भाषण

परिषदेचे मुख्य पाहुणे म्हणून ना. मालोजीराव नाईक निंबाळकर यांचें झालेलें भाषण थोडेसें निराशाजनक होतें, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. ते रत्नागिरीचा दौरा आटोपून सुमारे तीन वाजतां तेथें आले व त्यावेळीं त्यांना अधिवेशनांत मांडले जावयाचे ठराव पहावयास मिळाले; त्यामुळें ते कांहींही निश्चित उत्तर देऊं शकले नाहींत. एकाद्या प्रश्नाचें निश्चित उत्तर देण्यापूर्वी त्याबाबत कचेरींत असलेली सर्व माहिती विचारांत घेऊन व सहकाऱ्यांचा सल्ला घेऊनच त्यांना उत्तर द्यावें लागणार व तसा अवसर नसल्यानें त्यांनीं निश्चित उत्तर दिलें नसेल हें अगदीं योग्य आहे. परंतु नफेबाजी आणि काळा बाजार यामुळें कारखानदारांना आजच्या अडचणी उपस्थित झालेल्या आहेत व त्यांनीं या दोन गोष्टी सोडून द्याव्या असा जो त्यांनीं महाराष्ट्रीय कारखानदारांना सल्ला दिला तो थोडा अप्रस्तुत होता. महाराष्ट्रीय कारखानदारांनीं नफेबाजी व काळा बाजार केलेला नाहीं आणि आजच्या अडचणी या इतर अनेक कारणानें निर्माण झालेल्या आहेत. फक्त नफेबाजी आणि काळा बाजार एवढेंच त्यांस कारण नाहीं. इतर जीं कारणें आहेत तीं नाहींशीं करण्यासाठी सरकार खटपट करील असें आश्वासन हवें होतें तें मिळालें नाहीं. तसेंच संस्थानी करारांच्या भवितव्याबाबत 'मुंबई सरकारवर ते करार पाळण्याची कायदेशीर जबाबदारी नाहीं' असें जें त्यांनीं सांगितलें त्यामुळें मुंबई सरकार ते करार चालू ठेवण्यास प्रतिकूल असावें असा जो समज झाला तोही निराशाजनकच होता. कायदेशीर वस्तुस्थिति तशी असेलही, परंतु कायदा घडविणारे सरकारच आहे. तेव्हां कायदेशीर परिस्थितीकडे बोट दाखविल्यानें सरकारला यापेक्षां अधिक कांहीं करावयाचें नाहीं अशी साहजिक कल्पना होते. ही कल्पना खोटी ठरो आणि या कारखानदारांच्या सवलती आणखी कांहीं वर्षे चालू राहोत अशी आपण आशा करूं.

भोर येथें जमलेल्या मंडळींची सर्व व्यवस्था भोर इंडस्ट्रीज असोसिएशननें फार चांगली ठेविली होती हें मुद्दाम नमूद करावेसें वाटतें. कोणाकडे आपण पाहुणे म्हणून गेलों म्हणजे यजमानांनीं विशेषशी फिकीर जरी आपल्याबद्दल केलेली नसली तरी 'आपल्या उत्तम स्वागताबद्दल फार आभारी आहें' असें औपचारिकरीत्या म्हणण्याची पद्धत आहे; तशांपैकीं हें माझें म्हणणें नाहीं. भोर येथें जमलेल्या मंडळीपैकीं प्रत्येकजण तेथें झालेल्या व्यवस्थेबद्दल मनोमन तारीफ करीतच घरीं गेला असेल अशी माझी खात्री आहे. सरकारी अधिकारी समजुतदार आणि योग्य वेळीं योग्य गोष्ट करणारा असला म्हणजे कोणतेंही कार्य किती सुकर होतें हें सांगावयास नकोच. पुण्याचे कलेक्टर श्री यार्दी यांनीं रेशनबाबत जरूर त्या सर्व सवलती देऊन ही गोष्ट सिद्ध केली आणि त्यामुळेंच भोर इंडस्ट्रीज असोसिएशनचें काम फार सुकर झालें. दिलेल्या सवलतीबद्दल श्री. यार्दी यांचेही सर्वांनीं मनःपूर्वक आभार मानले हें अगदीं उचित झालें.

---

**हिंदुस्थानची निर्यात**—जुलै ते सप्टेंबर १९४९ ह्या तिमाहींत हिंदुस्थानांतून ९६ कोटी रुपयांचा माल निर्यात झाला. १९४९ च्या पहिल्या तिमाहींत १०२ कोटी रुपये किंमतीची आणि दुसऱ्या तिमाहींत ८७ कोटी रुपये किंमतीची निर्यात झाली होती. पहिल्या तिमाहींत दुर्लभ चलनाच्या देशांकडून २९ कोटी रुपयांची, दुसऱ्या तिमाहींत २२ कोटी रुपयांची आणि तिसऱ्या तिमाहींत २१ कोटी रुपयांची दुर्लभ हुंडणावळ मिळाली. एप्रिल ते जून ह्या तिमाहींपेक्षां जुलै ते सप्टेंबर ह्या तिमाहींत चहा, कापड आणि तागाच्या वस्तू अधिक निर्यात झाल्या. कच्चा ताग, कापूस आणि कातडीं ह्यांची निर्यात कमी प्रमाणांत झाली.

**बिस्किटांच्या निर्यातीस परवानगी**—हिंदी बिस्किटांच्या कारखान्यांना ह्यापुढें परवाना न घेतां आपला माल पाकिस्तान सकट कोठल्याही देशाला पाठवितां येईल. त्याचप्रमाणें कॅलेंडर्स, डायरीज, स्टेशनरी इत्यादि मालही असाच पाठवितां येईल.

## चित्रपट परदेशीं जाऊन घ्यावे काय ?

इंग्लंडच्या नॅशनल फिल्म कॉर्पोरेशनचें पहिलें वर्ष नुकतेंच पूर्ण झालें. ह्या कालापैकीं पहिले सहा महिने सरकारी कॉर्पोरेशन ह्या स्वरूपापेक्षां कंपनीचेंच स्वरूप संस्थेला होतें. कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. लॉरी ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, कॉर्पोरेशननें ४४ फिल्म कंपन्यांना मिळून २६ निरनिराळीं कर्जे दिलीं. ह्या कर्जापैकीं बहुतेक कर्ज चित्रपटांचें वितरण करणाऱ्या कंपन्यांना दिलें होतें ही लक्षांत घेण्यासारखी बाब आहे. त्यापैकीं सर्वांत मोठी कंपनी जी 'ब्रिटिश लायन', तिनें कॉर्पोरेशनच्या कर्जाचा उपयोग करून चित्रपटांच्या निर्मितींत वाढ केली. चित्रपट काढणाऱ्या कंपन्यांमध्यें, युरोप खंडांत जरूर त्या जागीं प्रत्यक्ष जाऊन देखावे घेण्याची प्रवृत्ति दिसून येते. अशा तऱ्हेनें युरोप खंडांत जाऊन सरकारचा पैसा तेथें खर्च करणें कितपत योग्य आहे ह्यासंबंधीं चर्चा होऊं लागणें साहजिकच आहे. कारण, कॉर्पोरेशनचा हेतू ब्रिटिश बोलपटांच्या धंद्याला पैसा पुरविणें आणि तो धंदा पुन्हां व्यवस्थित चालू करणें असा आहे. परदेशीं जाऊन बोलपटाचा कांहीं भाग घेतल्यानें परकीय कामगारांना ब्रिटिश पैशाचा उपयोग होतो, अशी तक्रार करण्यांत येत आहे.

ह्या बाबतींत 'दि थर्ड मॅन' नांवाच्या चित्रपटाचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. चित्रपटांतील कांहीं भाग व्हिएन्ना येथें व बाकीचा ब्रिटिश, ऑस्ट्रिअन आणि हॉलिवूडमधील नटांच्या सहकार्यानें घेण्यांत आला. हा सर्व चित्रपट फक्त ब्रिटिश नटांकडून आणि लाकडी देखावे उभे करून घेता आला असता. पण, तसें केलें असतें तर चित्रपटाला सध्याची जागतिक आकर्षकता प्राप्त झाली नसती. तेव्हां व्यापारी दृष्टीनें, परदेशीं जाऊन चित्रपटाचा कांहीं भाग घेणें जरूर असेल तर तसें करणें धंद्याच्या दृष्टीनें हिताचेंच ठरेल. फिल्मच्या स्टुडिओंतील कामगारांना काम पुरविणें एवढाच हेतु नसेल, तर कॉर्पोरेशनसारख्या संस्थेला संकुचित दृष्टीकोन ठेऊन चालणार नाहीं हें उघड आहे. फिल्मच्या धंद्याच्या दृष्टीनें जरूर असेल तर इंग्लंडहून युरोपखंडांतच काय पण आणखीही दूर जाणें सयुक्तिक ठरेल. सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार मि. रुडियार्ड किपलिंग ह्यांच्या 'किम' ह्या कादंबरीवर आधारलेला बोलपट काढण्यांत येणार आहे. त्यासाठी एम्. जी. एम्. कंपनीतर्फे डायरेक्टर मि. व्हिक्टर सॅव्हिल हे नुकतेच हिंदुस्थानला आले आहेत. हा चित्रपट रंगीत करण्यांत येणार आहे. 'किम' ह्या कादंबरींतील स्थानिक वातावरण निर्माण करण्यासाठी बराच खर्च येईल. तथापि हा खर्च चित्रपटाच्या व्यापारी यशाच्या दृष्टीनें फल देणारा असल्यानें एम्. जी. एम्. कंपनी तो सोसण्यास तयार आहे. चित्रपटांच्या निर्मिती विभागाचे संचालक आणि कलेचे संयोजक ह्यांनीं दोन महिने हिंदुस्थानांत मुक्कामच ठोकला आहे. 'किम' बोलपटावर १० लाख डॉलर्स खर्च करण्यांत येणार आहेत; आणि त्यापैकीं बरीच रक्कम हिंदुस्थानांत खर्ची पडणार आहे.

---

**१९५० सालांत २१ सुट्या**— १९५० सालांत हिंदुस्थान सरकारनें २१ सार्वजनिक सुट्या मंजूर केलेल्या आहेत. १९५० सालापासून इंग्लंडच्या राजेसाहेबांच्या जन्मादिनाची हिंदुस्थानांत सुट्टी देण्यांत येणार नाहीं.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९८,२८५ |

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः—९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई, (मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली)

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,६२,२५० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २९,३८,२०० |
| ठेवी | रु. ७,४७,०९,९०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,६३,००,००० |

प्रांतांतील बारा जिल्ह्यांमध्यें ५६ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

(United Advertisers)

## कंपनी कायद्यांत नियोजित दुरुस्ती

(४)

### किमान शेअर विक्रीचें ('मिनिमम सबस्क्रिप्शन') बंधन

खासगी कंपनी नोंदणीचे दिवसापासूनच व्यवहार करूं शकते, तसा व्यवहार पब्लिक कंपनी करूं शकत नाहीं. व्यवहारास प्रारंभ करण्यास रजिस्ट्रारनें सर्टिफिकेट दिल्याविना, पब्लिक कंपनीस व्यवहार सुरू करतां येत नाहीं. हें सर्टिफिकेट खालील अटी पार पडल्या, तरच दिलें जातें:— (१) रजिस्ट्रारकडे प्रॉस्पेक्टस किंवा स्टेटमेंट इन ल्यू ऑफ प्रॉस्पेक्टस ह्यांपैकी एक नोंदलेला पाहिजे. (२) किमान भाग भांडवल विकलें गेलें आहे. (३) शेअर्सची पहिली अलॉटमेंट डायरेक्टरांनीं केली आहे; ही अलॉटमेंट भाग भांडवलाच्या किमान विक्रीइतकी तरी पाहिजे. (४) अर्जाचे व अलॉटमेंटचे पैसे स्वतःच्या शेअर्स बावत डायरेक्टरांनीं भरले आहेत. (५) वरील सर्व गोष्टी केल्याबद्दल रजिस्ट्रारकडे लेखी दाखला १०३ कलमाप्रमाणें नोंदविलेला आहे.

कायद्याच्या १०१ व्या कलमांत नमूद केलेल्या खर्चाच्या बाबी भागविण्यापुरती वाजवी रक्कम जमा झाली नसल्यास कंपनी उभीच राहूं शकत नाहीं. ह्या किमान रकमेपेक्षा कमी किंमतीचे शेअर्स डायरेक्टर अलॉट करूं लागले तर कंपनी अडचणींत यावयाची. किमान शेअरविक्रीच्या अटीमुळें जनतेंत विश्वास निर्माण होऊं शकतो. किमान शेअरविक्रीची रक्कम जेवढी मोठी असेल, तितका जनतेचा विश्वास अधिक बसतो. ही किमान रक्कम ('मिनिमम सबस्क्रिप्शन') डायरेक्टांरांचे मतें खालील खर्चास पुरेशी असली पाहिजे:— (अ) विकत घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या मालमत्तेची खरेदी किंमत—जी शेअर विक्रीच्या रकमेंतून पूर्णत: अथवा अंशत: भागविणेंची आहे. (ब) प्राथमिक खर्च व शेअर विक्रीबाबत द्यावयाचें कमिशन. (क) वरील बाबींसाठीं कंपनीनें कर्ज काढलें असल्यास त्याची परत फेड. (ड) खेळतें भांडवल.

अपुऱ्या भांडवलानें कंपन्या निघूं नयेत ह्यासाठी १०१ व्या कलमांतील ह्या तरतुदी १९३६ च्या दुरुस्ती कायद्यानें घातल्या. वरील चारहि बाबींसंबंधीं स्वतंत्र आकडे देणें इंग्लिश कंपनी कायद्याप्रमाणें सक्तीचें आहे; सध्याच्या हिंदी कंपनी कायद्याप्रमाणें चारहि बाबींस मिळून आवश्यक असणारी रक्कम एकत्रित करून त्याचा एकच आकडा सांगितला तरी चालतो. हा आकडा किमान शेअरविक्रीस पुरेसा आहे किंवा नाहीं हें नीट पहाणें जनतेस त्यामुळें शक्य होत नाहीं. ह्यासाठी सरकारची सूचना अशी:—(१) वरील चारी बाबींसंबंधीं तपशीलवार माहिती दिली पाहिजे. (२) वेगवेगळया प्रकारच्या कंपन्यांसाठी अधिकृत भांडवलाच्या टक्केवारी किमान रक्कम सरकारनें ठरवून द्यावी. (३) चार बाबींस लागणारी एकूण रक्कम व अधिकृत भांडवलाच्या टक्केवारीनें येणारी रक्कम ह्यांपैकी जी मोठी असेल तेवढी किमान शेअरविक्री आवश्यक करावी. (४) ही रक्कम व तिचा तपशील प्रॉस्पेक्टसमध्यें नमूद केला पाहिजे.

### कंपन्यांचीं नांवें

कित्येक कंपन्या मोठाल्या व्यक्तींचीं, स्थळांचीं किंवा देशांचीं नांवें धारण करतात अथवा दिशाभूल करणारीं मोठालीं नांवें त्या घेतात. अस्तित्त्वांत असलेल्या इतर कंपन्यांच्या नांवानें किंवा त्यांच्याशीं बरेंच साम्य असलेल्या नांवानेंहि कांहीं कंपन्या नोंदल्या जातात. (१) मध्यवर्ती सरकारच्या मतें जें नांव अयोग्य ठरेल, त्या नांवानें कंपनी नोंदली जाऊं नये; (२) एकादी कंपनी, अस्तित्त्वांत असलेल्या दुसऱ्या कंपनीच्या नांवाखालीं किंवा त्याच्याशीं साम्य असलेल्या नांवाखालीं नोंदली गेलीच, तर तिनें रजिस्ट्रारनें हुकूम करतांच तें नांव बदललें पाहिजे. अर्थात्, मध्यवर्ती सरकारकडे ह्याबाबत अपील करण्याचा कंपनीस अधिकार राहील, अशा दोन सूचना सरकारनें केल्या आहेत. कांहीं कंपन्या अयोग्य व्यवहार करतात किंवा कांहीं ठिकाणीं लोकांच्या रोषास पात्र होतात आणि मग एकाएकीं नांव बदलून दुसऱ्या ठिकाणीं व्यवहार सुरू करतात; जुन्या नांवाचा ते पत्ताहि लागू देत नाहींत. अशा अनिष्ट गोष्टींपासून जनतेचें संरक्षण व्हावें, ह्यासाठी ज्या वेळीं कंपनी नांव बदलेल, तेव्हां ती जेथें जेथें नवें नांव लावील तेथें जुन्या नांवाचाहि तिनें निर्देश केला पाहिजे, अशी सरकारची शिफारस आहे.

---

### इं. इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची असोसिएट परीक्षा

वरील परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांत खालील नांवें आढळतात:—

(कु.) सुशीला नीलकंठ हजारे, रिझर्व्ह बँक (मुंबई)
पां. ह. गांधी, सांगली बँक (सोलापूर)
म. अ. देवचके, देना बँक (अहमदनगर)
दि. ना. पाध्ये, इं. बँक (अमरावती)
कृ. रा. गोडबोले, इं. बँक (सोलापूर)
पु. पां. एरंडे, इं. बँक (पुणें)
मु. बा. गडकरी, सें. बँक (हैद्राबाद)
ल. शं. लोंढे, इं. बँक (अहमदनगर)
बा. वा. घमंडे, बँक ऑफ औंध (सातारा)
श्री. वि. पोतनीस, देना बँक (वालचंदनगर)
वि. द. देशपांडे, न्यू सिटिझन बँक (मुंबई)
भा. का. चौबळ, युनायटेड कमर्शिअल बँक (पुणें)

### हिंदची पाकिस्तानला निर्यात

ऑगस्ट, १९४९ ह्या महिन्यांत हिंदमधून पश्चिम पाकिस्तानांत ५७,१४,००० रुपये किंमतीच्या मालाची निर्यात करण्यांत आली. पूर्व आणि प. पंजाबच्या सरहद्दीवरील जकातनाक्यांच्या नोंदीवरून हा अंदाज करण्यांत आला आहे.

---

### अर्नाळा बेटावर दीपगृह

मुंबईच्या उत्तरेस ३५ मैलांवर वैतरणा नदीच्या मुखाशीं अर्नाळा नांवाचें बेट आहे. ह्या बेटावर सामुद्रिक आणि हवाई वहातुकीला सूचना देण्यासाठीं आधुनिक पद्धतीचें एक दीपगृह बांधण्यांत येणार आहे.

---

### ब्रिटननें कानडाकडून गहूं कां घेतला ?

ब्रिटन आणि कानडा ह्यांच्यांतील कराराप्रमाणें, ब्रिटननें मार्शल मदत योजनेंतील १७५ कोटी डॉलर्सचा गहूं कानडाकडून घेतला होता. ह्या कराराबाबत अमेरिकेच्या वरिष्ठ सभागृहाच्या शेतकी कमिटीनें चौकशी करण्याचें ठरविलें आहे.

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९९५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.